जळगाव : संघर्ष मानवी आयुष्याचा दुवा आहे. त्याशिवाय यश मिळत नाही. पैसा मिळविण्यासाठी नोकरी महत्त्वाचीच आहे मात्र समाजस्वास्थ जपण्यासाठी देखील प्रयत्न करावे असे प्रतिपादन के.सी.ई.संस्थेचे सचिव अडव्होकेट एस.एस.फालक यांनी केले.

मू.जे.महाविद्यालयाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेतर्फे मेस्ट्रो २०१७-१८ या राष्ट्रीय स्पर्धेचे उद्धाटन २० सप्टेबरला झाले. यावेळी मंचावर प्राचार्य उदय कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. ए.पी.सरोदे, समन्वयक कल्पना नंदनवार, स्पर्धा संयोजन सचिव सुरेखा पालवे उपस्थित होते.

प्रस्तावनेत स्पर्धेची माहिती सुरेखा पालवे यांनी सांगितली. प्राचार्य डॉ. कुलकर्णी यांनी स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा देत आयुष्यात आव्हानांना सामोरे जाण्यास शिकावे असे सांगितले. अडव्होकेट एस.एस.फालक यांनी, तुमच्यामुळे कोणाचे तरी आयुष्य उजळले तर तुमचे जीवन आपोआप बहरते असे सांगितले.

सुत्रसंचालन वैभव चतुर्भुज आणि कीर्ती अलकरी यांनी तर आभार प्रा. अमोल बावस्कर यांनी केले.

************************************************************

## <u>दिवसभरात स्पर्धेविषयी</u>

स्पर्धेत ऑनलाईन स्टोक मार्केट गेम, जाहिरात विकास, प्रश्नमंजुषा, पॉवर पॉइंट सादरीकरण या प्रकारांचा समावेश होता.

ऑनलाईन स्टोक मार्केट गेम स्पर्धेत ४१ संघातील ६३ जणांनी सहभाग घेतला होता. ४ तासात विद्यार्थ्यांनी कौशल्य पणाला लावीत १ करोड रुपयांपर्यतचे वेबसाईटवर शेअर खरेदी विक्री करीत स्पर्धेत रंगत आणली.

जाहिरात विकास या स्पर्धेत **Ad Mad Show**, **DG Ad Show**, प्रो सेलो अशा ३ राउंडमध्ये १४ संघातील ५६ जणांनी सहभाग नोंदविला. जाहिरात करणे, ती ओळखणे व जाहिरातीचे उत्पादन विक्री करणे असे प्रकार स्पर्धक विद्यार्थ्यांनी करून दाखविले. परीक्षण आयएमआर महाविद्यालयाचे डॉ.अनुपमा चौधरी, एसएसव्हीपीएस महाविद्यालय, धुळेचे प्रा.भाग्यश्री पाटील यांनी केले.

पीपीटी स्पर्धेत विषय देण्यात आले. त्यात विद्यार्थ्यानी जीएसटी, सोफ्ट स्किल्स, मार्केटिंग अशा विविध विषयांचे प्रभावी सादरीकरण करीत परीक्षकांना जिंकून घेतले. ४३ संघातील ६६ जणांनी स्पर्धेत सहभाग घेतला. परीक्षण आयएमआर महाविद्यालयाचे प्रा.बी.जे.लाठी आणि प्रा. तनुजा फेगडे यांनी केले.

प्रश्नमंजुषा स्पर्धेत सामान्य ज्ञान, मनुष्यबळ व्यवस्थापन, मार्केटिंग, संगणकशास्त्र, अकौन्टिंग विषयी विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे उत्तरे दिलीत. या स्पर्धेत ३४ संघातील ९२ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. जळगाव, धुळे, पुणे, नांदेड, औरंगाबाद येथील संघांचा सहभाग होता.

## पारितोषिक वितरण

जळगाव :. विद्यार्थ्यांनी आयुष्यात वाणिज्य क्षेत्रात करिअर करीत असताना आपले कौशल्य अद्ययावत ठेवावे. स्पर्धा असावीच, मात्र ती ईर्षेची नसावी. व्यवसायात एकमेकांना सहकार्य असावे, तेव्हा देशाच्या प्रगतीला आपण हातभार लावू शकणार असे प्रतिपादन के.सी.ई.संस्थेच्या आयएमआर महाविद्यालयाचे संचालक डॉ.शिल्पा बेंडाळे यांनी केले.

मू.जे.महाविद्यालयाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेतर्फे मेस्ट्रो २०१७-१८ या राष्ट्रीय स्पर्धेचे पारितोषिक वितरण डॉ. बेंडाळे यांचे हस्ते २०

सप्टेबरला झाले. यावेळी मंचावर अध्यक्षस्थानी प्राचार्य उदय कुलकर्णी, प्रमुख पाहुणे उपप्राचार्य डॉ. ए.पी.सरोदे, समन्वयक कल्पना नंदनवार, स्पर्धा संयोजन सचिव सुरेखा पालवे उपस्थित होते.

स्पर्धेचा आढावा सुरेखा पालवे यांनी घेतला. परीक्षकामधून प्रा.बी.जे.लाठी, संघ व्यवस्थापकांमधून प्रा. योगिता चौधरी आणि स्पर्धकांमधून नूतन मराठा महाविद्यालयाच्या सायली देसाई यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. बेंडाळे यांनी, स्पर्धेच्या युगात आपले उत्पादन विक्री करण्यासाठी नैतिकतेने सामोरे जावे असे सांगत जीवघेणी स्पर्धा कधीही करू नका असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.कुलकर्णी यांनी बक्षीस मिळाले नाही म्हणून नाराज होवू नका, तर आपले काय चुकले त्याचा अभ्यास करा व त्यातून शिकत पुढे जा असे सांगितले.

सुत्रसंचालन वैभव चतुर्भुज आणि कीर्ती अलकरी यांनी तर आभार डॉ.प्रदीप जोशी यांनी केले.